23 June 2026

| To<br>Corporate Relations Department.<br>**BSE Limited**<br>1st Floor, New Trading Ring,<br>Rotunda Building, P J Tower,<br>Dalal Street, Fort,<br>Mumbai 400 001 | To<br>Corporate Listing Department.<br>**National Stock Exchange of India Ltd.**<br>Exchange Plaza, 5th Floor<br>Plot No.C-1, G Block,<br>Bandra-Kurla Complex,<br>Bandra (East), Mumbai 400 051 |
|---|---|
| **BSE Code: 532978** | **NSE Code: BAJAJFINSV** |

Dear Sir/Madam,

**Sub.: Disclosure under Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 - Newspaper Advertisement with respect to 19th Annual General Meeting ('AGM') to be held through Video Conferencing/Other Audio-Visual Means**

We enclose herewith copy of the advertisements published on 23 June 2026 in Financial Express – all editions (English) and Kesari - Pune edition (Marathi).

The aforesaid advertisements are also available on the website of the Company i.e., https://www.aboutbajajfinserv.com/investor-relations-annual-reports.

Kindly take the same on record.

Thanking you,

Yours Faithfully,
For **Bajaj Finserv Limited**

UMA OMKAR SHENDE
Digitally signed by UMA OMKAR SHENDE
Date: 2026.06.23 17:29:21 +05'30'

**Uma Shende**
**Company Secretary**
Email ID: investors@bajajfinserv.in
Encl.: as above



BAJAJ FINSERV LIMITED
https://www.aboutbajajfinserv.com/about-us

**Corporate Office:** 6th Floor, Bajaj Finserv Corporate Office, Off Pune - Ahmednagar Road, Viman Nagar, Pune - 411 014, Maharashtra, India
Tel: +91 20 7150 5700 | Fax: +91 20 7150 5792
**Registered Office:** C/o Bajaj Auto Limited Complex, Mumbai - Pune Road, Akurdi, Pune - 411 035, Maharashtra, India
**Corporate ID No.:** L65923PN2007PLC130075 | **Email ID:** investors@bajajfinserv.in

# नको अटी, नको शर्ती; शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा

## विरोधकांच्या घोषणांनी विधानभवन दणाणले

**मुंबई, (प्रतिनिधी)** : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीने शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करत विरोधी पक्षाच्या आमदारांनी नको अटी, नको शर्ती; शेतकऱ्यांना हवी कर्जमुक्ती, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा, अशा घोषणा दिल्या.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरुवात झाली. सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून आंदोलन करत जोरदार घोषणा दिल्या. विधानभवनातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर पायऱ्यांवर हातात फलक घेऊन आंदोलन केले. यावेळी विधिमंडळाचा परिसर घोषणांनी दणाणून गेला. शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, अंबादास दानवे, काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक आमदार उपस्थित होते. महायुतीने सत्तेत येताना शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात सत्तेवर आल्यानंतर कर्जमाफीसाठी अनेक अटी व शर्ती लादून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली. त्यामुळे कोणत्याही अटींशिवाय सर्वसमावेशक कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### कर्जमाफीचे सोंग...

महायुतीचे आमदार सभागृहाच्या दिशेने जात असताना आघाडीच्या आमदारांनी पुन्हा घोषणा देत त्यांना डिवचण्याचा प्रयत्न केला. लबाड लांडगं ढोंग करतंय... कर्जमाफीचं सोंग करतंय..., शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालाच पाहिजे, कोण म्हणतो देणार नाय...घेतल्याशिवाय राहणार नाय... अशा घोषणा आघाडीच्या आमदारांनी दिल्या. पायऱ्यांवर आंदोलन सुरू असताना दुसऱ्या बाजूने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व काही मंत्री व सत्ताधारी आमदार छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी जात असताना विरोधकांच्या घोषणा टिपेला गेल्या होत्या.

### टंचाईवर चर्चा करा : नाना पटोले

विधानसभेच्या कामकाजादरम्यान काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी राज्यातील दुष्काळ आणि पाणीटंचाईचा प्रश्न उपस्थित केला. 'अल निनो'च्या प्रभावामुळे राज्यातील नद्या, नाले, धरणे आणि तलाव कोरडे पडले असून भूजल पातळीही मोठ्या प्रमाणात खालावली आहे. अनेक गावांमध्ये व शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याने या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा घडवून आणावी, अशी मागणी त्यांनी केली.

# 'माहिती अधिकारा'तील बदल रद्द करा; अन्यथा, ५ जुलैपासून उपोषण

## अण्णा हजारे यांचा इशारा

**राळेगणसिद्धी** : राज्य सरकारने १२ जून २०२६ रोजी लागू केलेल्या महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २०२६ मधील विविध तरतुदींना ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी विरोध दर्शविला आहे. या नियमांमुळे माहितीचा अधिकार कायद्याची धार बोथट होत असल्याचा आरोप करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले आहे. तसेच, वादग्रस्त तरतुदी तात्काळ रद्द न केल्यास ५ जुलैपासून राळेगणसिद्धी येथील यादव बाबा मंदिरात बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.

नव्या नियमांमुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक खर्चिक, क्लिष्ट आणि निर्बंधित होणार असल्याचे हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे. तसेच, शुल्कवाढ, ओळखपत्र जोडण्याची सक्ती, एक विषय-एक अर्ज अट, पुनरावृत्ती अर्ज निकाली काढण्याची तरतूद, सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास अपील फेटाळण्याचा अधिकार, अर्जदाराच्या मृत्यूनंतर अपील बंद करण्याची तरतूद आणि वकिलांची मदत घेण्यावरील निर्बंध यासह विविध नियमांवर त्यांनी आक्षेप नोंदविला आहे.

या तरतुदी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या मूळ उद्देशालाच बाधा आणत असल्याचा दावा करत हजारे यांनी माहिती आयोगाची कार्यक्षमता वाढविणे, रिकामी पदे भरणे, प्रलंबित अपिलांचा निपटारा करणे आणि कलम ४ अंतर्गत माहितीचे स्वयंप्रकटन प्रभावीपणे राबविणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. माहितीचा अधिकार हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार असून, या नियमांबाबत जनतेच्या सूचना व हरकती न मागवता निर्णय घेण्यात आल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# मध्य प्रदेशातील अपघातात सहा प्रवाशांचा मृत्यू

**छिंदवाडा** : मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात पिक अप व्हॅनला एका मालमोटारीने धडक दिली. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला असून २१ जखमी झाले. छिंदवाडा –बैतुल राष्ट्रीय महामार्गावर तेमनी गावाजवळ दुर्घटना घडली. जिल्हा मुख्यालयापासून हे ठिकाण सुमारे ३० किलोमीटरवर आहे. सहा मृतांमध्ये एका महिलेचा समावेश असून २१ जखमी झाले, अशी माहिती पोलिस अधीक्षक अजय पांडे यांनी दिली. पिक अप व्हॅन रस्त्याकडेला उभी होती तिला मालमोटारीने धडक दिल्याने व्हॅन उलटली होती. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला. यानंतर अपघातग्रस्त वाहने हटवून वाहतूक पूर्ववत करण्यात आली.


**फुरसुंगी–उरुळी देवाची नगरपरिषद फुरसुंगी,**
**ता. हवेली, जि. पुणे–४१२३०८**
**ई–मेल:** fursungi.urulidevachinp2024@gmail.com

जावक क्र. ६९२/२०२६ दि. २२/०६/२०२६

**संदर्भ:– या कार्यालयाची निविदा जा.क्र./ फु.ऊ.दे.न.प./६१०/२०२६ दि. १२/०६/२०२६**

फुरसुंगी–उरुळी देवाची नगरपरिषद क्षेत्रात फेरीवाल्याचे सर्व्हेक्षण करणेकरीता (कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहून) इच्छूक /पात्र कंत्राटदाराकडून ऑफलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि. २२/०६/२०२६ निविदा सादर करणेच्या शेवटच्या दिवशी एकच निविदा प्राप्त झाल्याने सदर निविदा सादर करणेस दि. २४/०६/२०२६ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

शिक्का

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**फुरसुंगी–उरुळी देवाची नगरपरिषद**



महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सुचना**

मुळशी विभागाअंतर्गत नसरापूर उपविभागांतर्गत येणाऱ्या पीसी (PC) ४, ६, आणि ८ तसेच, पीसी (PC) १, २, आणि ५ ग्राहकांचे, दरमहा मीटर वाचन (Monthly Meter Reading) महावितरण मोबाईल ॲप (Mahavitaran Mobile App) किंवा IR/RF HHU द्वारे करणे. यात २० किलोवॅटपर्यंत भार असलेल्या LT ग्राहकांचा समावेश आहे (तसेच, महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद आणि नगरपंचायत हद्दीतील कृषी (AG) मिटर शहरी LT ग्राहक वगळता इतर सर्व AG ग्राहक वगळले आहेत). या कामामध्ये देयक छपाई (Bill Printing) आणि थेट ग्राहकांच्या जागेपर्यंत देयक वितरण (Bill Distribution) यांचा समावेश आहे. सदर कामासाठी ठेका पद्धतीने नामांकित व नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांचेकडुन ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदा क्र. EE/MUL/T-13, T–१४/२०२६–२७ (निविदा रक्कम रुपये १८.०० लाख प्रत्येकी) निविदा विक्री कालावधी २३.०६.२०२६ ते २९.०६.२०२६ पर्यंत, निविदा भरण्याची अंतिम तारिख २९.०६.२०२६. तांत्रिक निविदा उघडणेची तारीख ३०.०६.२०२६. काही अपरिहार्य कारणास्तव नियोजित तारखेस निविदा न उघडल्यास दुसऱ्या दिवशी उघडण्यात येतील. इसारा शुल्क ऑनलाईन किंवा डी.डी. च्या स्वरुपात निविदा भरणा मुदतीपूर्वी विभागीय कार्यालयात भरणे आवश्यक आहे.

अधिक माहिती साठी कृपया कंपनीचे संकेतस्थळ :–
https://etender.mahadiscom.in/eatApp/

**(पीआरओ/ पुणे झेड : ०७७/२०२६–२७)**

**कार्यकारी अभियंता, महावितरण, मुळशी विभाग.**



**उपविभागीय अधिकारी मावळ–मुळशी, उपविभाग पुणे यांचे न्यायालयात**

जाहीर नोटीस

क्र.फेरचौकशी/अपील/एसआर/४२४/२०२६
दिनांक – ०९/०६/२०२६

**श्री. प्रल्हाद लक्ष्मण जाधव**
रा–फ्लॅट नं.१०७, दुसरा मजला, राधाकृष्ण अपार्टमेंट,
धायरेश्वर मंदिरामागे, धायरी, पुणे. -----अपिलार्थी

विरुद्ध

**१) उदय नामदेव साळुंखे, २) स्वाती नामदेव साळुंखे**
दोघेही रा–बी–७०–७१, मधुगरी को.ऑप. सोसायटी, व्ही. एन पुरव मार्ग,
चेंबुर, मुंबई–४०००७१ -----प्रतिवादी

मौजे गव्हेंडे आपटी, ता.मावळ, जि.पुणे येथील गट नं.१२६ व इतर या मिळकतीबाबत फेरफार क्र.७१० च्या नोंदीविरूद्ध अपिलार्थी यांनी या न्यायालयामध्ये अपील दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दिनांक २९/०६/२०२६ रोजी तहसिल पुणे विभागीय महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, बावधन बु., ता.मुळशी, जि.पुणे येथे सकाळी ११.०० वा. निश्चित करण्यात आली आहे. तरी आपण किंवा आपले कायदेशीर प्रतिनिधी यांचेमार्फत आपलेकडील पुराव्याचे कागदपत्रांसह समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. अन्यथा याबाबत आपले काहीही एक म्हणणे नाही, असे समजून गुणवत्तेवर निर्णय घेतला जाईल, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**(सुरेंद्र नवले)**
**उपविभागीय अधिकारी**
**मावळ–मुळशी, उपविभाग, पुणे**


# कांगोत इबोलाचा उद्रेक

## २५४ बळी; हजारावर रुग्ण

**बुनिया** : दक्षिण आफ्रिकेतील कांगोत इबोलाचा संसर्ग झपाट्याने पसरला असून २५४ जणांचा बळी गेला आहे. रुग्णांची संख्या आता हजारावर गेली आहे. कोणता रुग्ण कोणाच्या संपर्कात आला होता, हे शोधून काढण्याचे आव्हान असल्याची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली.

कांगोच्या इटुरी प्रांतात १५ मे रोजी इबोलाचा उद्रेक झाला होता. आजाराचा नियंत्रण आणता येत नसले तरी रुग्ण बरे होत असल्याची बाब जमेची आहे. आतापर्यंत १०० हून अधिक जण बरे झाले आहेत. ३६५ रुग्णांना रुग्णालयात किंवा विलगीकरण कक्षात ठेवले आहे, अशी माहिती कांगोच्या आरोग्य मंत्रालयाने दिली.

इबोलाचा आजार बुंडीब्युग्यो विषाणूमुळे पसरतो. उपचाराची लस उपलब्ध नाही. त्यामुळे गेल्या महिन्यात सर्सग झपाट्याने वाढत गेला. संसर्गजन्य आजार असल्याने चिंता वाढली आहे. दरम्यान, रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ५५ टक्के आहे.

जर तुम्हाला एखाद्या साथीवर, विशेषत: इबोलाच्या साथीवर नियंत्रण मिळवायचे असेल, तर तुम्हाला पहिला रुग्ण कोण होता? हे माहित असणे आवश्यक आहे. ही साथ केव्हा सुरू झाली याबद्दल आम्हाला खात्री नाही, असे आफ्रिकेच्या रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्राचे महासंचालक डॉ. जीन कासेया यांनी गेल्या आठवड्यात 'द असोसिएटेड प्रेस'ला सांगितले.

अमोनिया वायू गळती

# बळींची संख्या पाचवर

**चेन्नई** : तामिळनाडूच्या तिरुवल्लूर जिल्ह्यातील अमोनिया वायू गळती दुर्घटनेतील बळींची संख्या पाचवर पोहोचली आहे. मृत कामगारांचे मृतदेह त्यांच्या मूळ गावी नेण्याची व्यवस्था केली जात असल्याची माहिती राज्याचे कामगार कल्याण मंत्री जे. महमद फरवास यांनी विधानसभेत दिली.

पेरियापालयम जवळील कनिगईपायर गावात रविवारी ही घटना घडली होती. मुख्यमंत्री विजय यांनी आरोग्य आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांचे एक संयुक्त पथक स्थापन केले आहे. हे पथक २४ तासांच्या आत प्राथमिक अहवाल आणि तीन दिवसांत सरकारला सविस्तर अहवाल सादर करेल, असे फरवास यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी पीडित कुटुंबाला प्रत्येकी दोन लाखांची आर्थिक मदत जाहीर केली आहे, असेही ते म्हणाले. तामिळनाडूमध्ये ५४,९५७ उद्योग असून त्यात २७.६५ लाख कामगार कार्यरत आहेत, असेही त्यांनी सांगितले.या घटनेत एकूण ७४ व्यक्ती बाधित झाल्याचे वृत्त आहे. पाच जणांचा मृत्यू झाला असून, दोघे जण उपचारानंतर घरी परतले आहेत. तर, उर्वरित ६७ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# फिलिपाईन्स गोळीबारात दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू

**मनिला** : फिलिपाईन्समधील हायस्कूलमध्ये सोमवारी गोळीबार झाला. त्या तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. सहकाऱ्यांची हत्या केल्याप्रकरणी दोन विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यात आले. टाकलोबान येथील सेन जोस नॅशनल हायस्कूलमध्ये गोळीबाराची घटना घडली होती. संशयित १४ ते १५ वयोगटातील असून त्यांनी पिस्तुलातून गोळ्या झाडल्या होत्या. गोळीबाराच्या घटनेमुळे सुमारे १ हजार ५०० विद्यार्थ्यांमध्ये घबराट पसरली होती..गोळीबार का केला ? याचा तपास सुरू केल्याची माहिती विभागीय पोलिस अधिकारी ब्रिगेडियर जनरल जॅसन कॅपोय यांनी दिली. संशयित हल्लेखोर विद्यार्थ्यांचे मित्र होते. संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडील पिस्तुले जप्त केली आहेत, असे ते म्हणाले.

# मोबाइलसह सापडलेल्या विद्यार्थिनीला न्यायालयीन कोठडी

## नीट फेरपरीक्षा

**जयपूर** : नीटच्या फेरपरीक्षेवेळी जयपूरमधील एका परीक्षा केंद्रावर मोबाइलचा वापर करताना आढळलेल्या २२ वर्षांच्या विद्यार्थिनीला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी सोमवारी दिली.

हिमांशी तिवारी असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. ती प्रेम नगर येथील रहिवासी आहे. बिंदायका परिसरातील केंद्रावर एका विद्यार्थिनीची पर्यवेक्षकांनी तपासणी केली. त्यावेळी तिच्याजवळ मोबाइल आढळला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने उत्तरे शोधण्यासाठी आपण हा मोबाइल सोबत आणल्याचे तिने कबूल केले आहे. मोबाइल जप्त करण्यात आला असून तो फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. या मोबाइलचा वापर केवळ उत्तरे शोधण्यासाठी केला गेला होता की प्रश्नपत्रिकेचा तपशील इतरांना पाठवण्यासाठीही केला गेला, हे तपासणीतून स्पष्ट होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणात पाच वर्षांचा कारावास आणि दहा लाखांचा दंड अशी तरतूद आहे.


BAJAJ FINANCE

**बजाज फायनान्स लिमिटेड**

**कंपनी ओळख क्र.:** एल६५९१०एमएच१९८७पीएलसी०४२९६१
**नोंदणीकृत कार्यालय:** C/o बजाज ऑटो लिमिटेड, आकुर्डी, पुणे - ४११ ०३५
**संकेतस्थळ:** https://www.aboutbajajfinserv.com/finance-about-us
**ईमेल आयडी:** investor.service@bajajfinserv.in | **दूरध्वनी क्रमांक:** (०२०) ७१५७ ६४०३ | **फॅक्स:** (०२०) ७१५७ ६३६४

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे ("ओएव्हीएम") होणाऱ्या ३९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत माहिती**

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, कंपनीच्या सदस्यांची ३९वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीसी/ओएव्हीएम द्वारे ("ई-एजीएम") गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार) आयोजित करण्यात येईल. ही सभा कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") आणि त्याअंतर्गत बनवलेल्या लागू नियमांच्या तरतुदी, तसेच मिनीस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सने ("एमसीए") जारी केलेल्या २२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या जनरल सर्क्युलर क्रमांक ०३/२०२५ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ("सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स") यांच्या अनुपालनात आयोजित केली जाईल. या ई-एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या कामकाजासाठी निर्धारित करण्यात आली आहे.

**ई-एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ च्या वार्षिक अहवाल खालील संकेतस्थळांवरही उपलब्ध करून दिले जातील:**

| | | |
|---|---|---|
| कंपनी | https://www.aboutbajajfinserv.com/finance-investor-relations-annual-reports | |
| स्टॉक एक्स्चेंजेस | बीएसई लिमिटेड | नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड |
| | https://www.bseindia.com/ | https://www.nseindia.com/ |
| केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ("केफिन") (ई-व्होटिंग सेवा प्रदाता म्हणून) | https://evoting.kfintech.com | |

सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन १२ मध्ये अलीकडेच करण्यात आलेल्या सुधारणेनुसार, कंपनीला लाभांश केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच अदा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार, सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की लाभांशाच्या देयकासाठी कंपनीकडून लाभांश वॉरंट्स, डिमांड ड्राफ्ट्स किंवा चेक्स प्रत्यक्ष स्वरूपात यापुढे जारी केले जाणार नाहीत.

**ईमेल पत्ता आणि/किंवा बँक खात्याचे तपशील नोंदविण्याची/अपडेट करण्याची पद्धत:**

| | |
|---|---|
| **फिजिकल होल्डिंग** | • ई-एजीएमची सूचना, आर्थिक वर्ष २०२६ चा वार्षिक अहवाल आणि ई-व्होटिंग लॉगिन क्रेडेन्शियल्स प्राप्त करण्यासाठी ईमेल पत्ता; किंवा<br>• इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस (ईसीएस) किंवा इतर कोणत्याही माध्यमातून थेट आपल्या बँक खात्यात लाभांश प्राप्त करण्यासाठी बँक खात्याचे तपशील.<br>वरील तपशील अपडेट करण्यासाठी, आवश्यक सहाय्यक कागदपत्रांसह योग्य प्रकारे भरलेला आणि स्वाक्षरी केलेला फॉर्म आयएसआर-१ केफिनकडे या पत्त्यावर सादर करावा: युनिट: बजाज फायनान्स लिमिटेड, सेलेनियम बिल्डिंग, टॉवर-बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, रंगारेड्डी, तेलंगणा, भारत - ५०० ०३२.<br>ज्या सदस्यांचा ईमेल पत्ता कंपनी/केफिनकडे आधीच नोंदणीकृत आहे, ते आवश्यक कागदपत्रे einward.ris@kfintech.com या ईमेलवर पाठवून त्यांच्या बँक खात्याचे तपशील अपडेट करू शकतात. |
| **डिमॅटेरियलाइज्ड होल्डिंग** | डिमॅटेरियलाइज्ड (डिमॅट) स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांनी आपला ईमेल पत्ता आणि बँक खात्याचे तपशील संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदवावेत/अपडेट करावेत. |

**ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत:**

रिमोट ई-व्होटिंग किंवा सभेदरम्यान ई-व्होटिंग करण्याची सविस्तर प्रक्रिया ई-एजीएमच्या सूचनेमध्ये दिली जाईल.

काही प्रश्न किंवा शंका असल्यास, सदस्यांनी einward.ris@kfintech.com वर लिहावे किंवा टोल-फ्री क्रमांक १८००-३०९-४००१ वर संपर्क साधावा.

**बजाज फायनान्स लिमिटेड** करिता
स्वाक्षरी/-
**आर विजय**
**कंपनी सचिव**

स्थळ: पुणे
दिनांक: २२ जून २०२६



BAJAJ FINSERV

**बजाज फिनसर्व लिमिटेड**

**कंपनी ओळख क्र.:** एल६५९२३पीएन२००७पीएलसी१३००७५
**नोंदणीकृत कार्यालय:** बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स, मुंबई-पुणे रोड, पुणे ४११ ०३५
**संकेतस्थळ:** https://www.aboutbajajfinserv.com/about-us
**ईमेल आयडी:** investors@bajajfinserv.in | **दूरध्वनी क्रमांक:** (०२०) ७१५७ ६०६४ | **फॅक्स:** (०२०) ७१५० ५७९२

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे ("ओएव्हीएम") होणाऱ्या १९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत माहिती**

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, कंपनीच्या सदस्यांची १९वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीसी/ओएव्हीएम द्वारे ("ई-एजीएम") शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी दुपारी १२:१५ वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार) आयोजित करण्यात येईल. ही सभा कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") आणि त्याअंतर्गत बनवलेल्या लागू नियमांच्या तरतुदी, तसेच मिनीस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सने ("एमसीए") जारी केलेल्या २२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या जनरल सर्क्युलर क्रमांक ०३/२०२५ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ("सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स") यांच्या अनुपालनात आयोजित केली जाईल. या ई-एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या कामकाजासाठी निर्धारित करण्यात आली आहे.

**ई-एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ चा वार्षिक अहवाल खालील संकेतस्थळांवरही उपलब्ध करून दिले जातील:**

| | | |
|---|---|---|
| कंपनी | https://www.aboutbajajfinserv.com/investor-relations-annual-reports | |
| स्टॉक एक्स्चेंजेस | बीएसई लिमिटेड | नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड |
| | https://www.bseindia.com/ | https://www.nseindia.com/ |
| केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ("केफिन") (ई-व्होटिंग सेवा प्रदाता म्हणून) | https://evoting.kfintech.com | |

सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन १२ मध्ये अलीकडेच करण्यात आलेल्या सुधारणेनुसार, कंपनीला लाभांश केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच अदा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार, सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की लाभांशाच्या देयकासाठी कंपनीकडून लाभांश वॉरंट्स, डिमांड ड्राफ्ट्स किंवा चेक्स प्रत्यक्ष स्वरूपात यापुढे जारी केले जाणार नाहीत.

**ईमेल पत्ता आणि/किंवा बँक खात्याचे तपशील नोंदविण्याची/अपडेट करण्याची पद्धत:**

| | |
|---|---|
| **फिजिकल होल्डिंग** | • ई-एजीएमची सूचना, आर्थिक वर्ष २०२६ चा वार्षिक अहवाल आणि ई-व्होटिंग लॉगिन क्रेडेन्शियल्स प्राप्त करण्यासाठी ईमेल पत्ता; किंवा<br>• इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस (ईसीएस) किंवा इतर कोणत्याही माध्यमातून थेट आपल्या बँक खात्यात लाभांश प्राप्त करण्यासाठी बँक खात्याचे तपशील.<br>वरील तपशील अपडेट करण्यासाठी, आवश्यक सहाय्यक कागदपत्रांसह योग्य प्रकारे भरलेला आणि स्वाक्षरी केलेला फॉर्म आयएसआर-१ केफिनकडे या पत्त्यावर सादर करावा: युनिट: बजाज फिनसर्व लिमिटेड, सेलेनियम बिल्डिंग, टॉवर-बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, रंगारेड्डी, तेलंगणा, भारत - ५०० ०३२.<br>ज्या सदस्यांचा ईमेल पत्ता कंपनी/केफिनकडे आधीच नोंदणीकृत आहे, ते आवश्यक कागदपत्रे einward.ris@kfintech.com या ईमेलवर पाठवून त्यांच्या बँक खात्याचे तपशील अपडेट करू शकतात. |
| **डिमॅटेरियलाइज्ड होल्डिंग** | डिमॅटेरियलाइज्ड (डिमॅट) स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांनी आपला ईमेल पत्ता आणि बँक खात्याचे तपशील संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदवावेत/अपडेट करावेत. |

**ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत:**

रिमोट ई-व्होटिंग किंवा सभेदरम्यान ई-व्होटिंग करण्याची सविस्तर प्रक्रिया ई-एजीएमच्या सूचनेमध्ये दिली जाईल.

काही प्रश्न किंवा शंका असल्यास, सदस्यांनी einward.ris@kfintech.com वर लिहावे किंवा टोल-फ्री क्रमांक १८००-३०९-४००१ वर संपर्क साधावा.

**बजाज फिनसर्व लिमिटेड** करिता
स्वाक्षरी/-
**उमा शेंडे**
**कंपनी सचिव**

स्थळ: पुणे
दिनांक: २२ जून २०२६